शुक्रवार दि.२० सप्टेंबर २०२४
किंमत २ रुपये | महाराष्ट्र
मराठी दैनिक
वर्ष : ०२ अंक : १८
टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

दैनिक लोकनेता
बीड

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत
संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

Email : elokneta@gmail.com | Lokneta News - लोकनेता न्युज | 8459977904 | epaper.lokneta.in

काँग्रेस-भाजपला उखडून फेकण्याचे दिवस

या दोन्ही पक्षांनी लुटारू व्यवस्था निर्माण करत आमच्या डोळ्यांतून पाणी काढले-बच्चू कडू

आगामी निवडणूक बदला घेण्याची

बच्चू कडू म्हणाले, आपण मागील ७५ वर्षांपासून शेतकरी व शेतमजुरांची लढाई लढत आहोत. पण अजूनही शेतकरी व शेतकऱ्यांच्या मुलांना मानसन्मान मिळत नाही. शेतकऱ्यांवर अजूनही आत्महत्या करण्याची वेळ येते. त्यामुळे त्यांच्यात सूड घेण्याची भावना निर्माण होत आहे. त्यामुळे आगामी विधानसभा निवडणूक ही बदला घेणारी असेल यात शंका नाही.

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

मुंबई (वृत्तसंस्था)

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारला पाठिंबा देणाऱ्या प्रहार जनशक्तीचे नेते आमदार बच्चू कडू यांनी भाजप व काँग्रेस या दोन्ही पक्षांना उखडून फेकण्याचे दिवस आल्याची टीका केली आहे. या दोन्ही पक्षांनी आमच्या डोळ्यांतून पाणी काढले. त्यामुळे त्यांना निवडणुकीच्या माध्यमातून उखडून फेकण्याचे दिवस आलेत, असे ते म्हणालेत. त्यांच्या या विधानामुळे महायुतीच्या गोटात मोठी खळबळ माजली आहे.

राज्यात विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने राजकारण चांगलेच तापले आहे. मुख्य लढत महायुती व महाविकास आघाडीमध्ये आहे. पण त्यात स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी व आमदार बच्चू कडू यांनी तिसरी आघाडी स्थापन करण्याचे प्रयत्न चालवून मोठी रंगत आणली आहे. या पार्श्वभूमीवर बच्चू कडू यांनी उपरोक्त विधान केले आहे.

येणाऱ्या निवडणुकीत ज्यांनी - ज्यांनी जात, धर्म सांगून आपले मत घेतले. त्यांना जागा दाखवल्याशिवाय राहायचे नाही. कांद्यामुळे ज्यांनी आम्हाला रडवले, मग ती काँग्रेस असो की भाजप असो कुणालाही सोडायचे नाही.

भाजप, काँग्रेसने लुटणारी व्यवस्था निर्माण केली

बच्चू कडू पुढे म्हणाले, मागील ७५ वर्षांत काँग्रेस व भाजप या दोन्ही पक्षांनी राज्य केले. या दोन्ही पक्षांनी आमच्या डोळ्यांतून पाणी काढण्याचे काम केले. शेतकरी रात्रीचा दिवस व दिवसाची रात्र करून काबाडकष्ट करतो. असे करताना तो ऊन, वारा, पाऊस कशाचीती परवा करत नाही. पण भाजप व काँग्रेसने देशात लुटणारी व्यवस्था निर्माण केली. त्यामुळे या दोन्ही पक्षांना उखडून फेकण्याचे दिवस आलेत.

भोई बांधवांचा घरकुला साठी साठ वर्षाचा संघर्ष

रिपब्लिकन सेनेची गटविकास अधिकाऱ्यांकडे मागणी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

उमरखेड | सय्यद रहीम राजा

उमरखेड तालुक्यातील मौ. देवसरी, खरुस (बु), चातारी व बिटरगाव (बु) येथील भोई समाज बांधव अनेक वर्ष्यापासून घरकुल योजनेचा लाभ मिळण्यासाठी सातत्याने संबंधित ग्रामपंचायत कार्यालयाकडे मागणी करीत असून, घरकुल योजनेचा लाभ हा गावातील सधन व संबंधातील व्यक्तींना देण्यात येत आहे. भोई समाज बांधव हे सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागास असून त्यांना जाणीवपूर्वक अनेक वर्ष्यापासून घरकुल योजने पासून वंचित ठेवण्यात येत असल्याचा आरोप सदरील गावातील भोई समाज बांधवाच्या वतीने करण्यात येत आहे.

सदर प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कार्यवाही करण्यात यावी व घरकुला पासून वंचित राहिलेल्या भोई समाजातील लाभार्थ्यांना तात्काळ घरकुल योजनेचा लाभ देण्यात यावा अशी मागणी रिपब्लिकन युवा सेनेच्या वतीने उमरखेड पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांच्याकडे करण्यात आली.

यावेळी जिल्हाध्यक्ष सुनिल पाटील चिंचोलकर, शहराध्यक्ष शुद्धोधन दिवेकर, राजू आगिरे, ता.अध्यक्ष गौतम नवसागरे, ता. उपाध्यक्ष भीमराव खंदारे, ता. कार्याध्यक्ष साहेबराव कदम, शहर संघटक नंदु इटकरे व देवसरी, खरुस (बु), चातारी व बिटरगाव (बु) येथील भोई समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मुख्यमंत्री साहेब लाडक्या बहिण योजने प्रमाणेच

माझे लाडके पत्रकार बांधव हि योजना तात्काळ चालू करण्यात यावी-पत्रकार सिध्दार्थ कांबळे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

बिलोली | गौतम गावंडे

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनांचा मोठा गाजावाजा करीत महाराष्ट्रातील कोट्यावधी महिलांचे फॉर्म भरून घेऊन १५ ऑगस्ट २०२४ रोजी महिलांना प्रत्येकी तीन हजार रुपये प्रमाणे खात्यात दोन महिन्यांचे रक्कम जमा करण्यात आले आहे.

त्यामुळे महाराष्ट्रातील प्रत्येक महिला मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजना चालू झाल्यामुळे आनंदीत झाले आहेत. त्यामुळे या योजनेची सर्वत्र मोठ्या प्रमाणात चर्चा होत आहे.मुख्यमंत्री साहेब लाडक्या बहिणी योजने प्रमाणेच महाराष्ट्रातील पत्रकार बांधवांसाठी माझे लाडके पत्रकार बांधव ही योजना लवकरात लवकर चालू करावी. कारण पत्रकार बांधव हा लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ असून तो जेव्हा शोध पत्रकारिता करत असतो तेव्हा त्याला मोठ्या प्रमाणात मेहनत करावी लागते आणि वेगवेगळ्या दृष्टिकोनाने ग्रामीण भागातील व शहरी भागातील विविध समस्यावर आपल्या लेखणीच्या माध्यमातून तळागळातील सामान्य माणसाला न्याय मिळवून देण्यासाठी तो अहोरात्र लिखाण करत असतो लिखाण करत असताना त्यांना अनेक गोष्टीला तोंड देत जावे लागते आणि वेळप्रसंगी पत्रकारांवर अनेक जीवघेणे हल्ले पण आजपर्यंत झाले आहेत. त्या हल्ल्यांना न जुमानता व आपल्या जीवाची परवा न करता निर्भिडपणे तो पत्रकरिता करत असतो पण पत्रकारिता करीत असताना जर पत्रकारांना काही अडचणी आल्यास किंवा त्यांच्या जीवाला धोका निर्माण झाल्यास पत्रकारांच्या सुरक्षिततेसाठी महाराष्ट्र शासनाकडून साधी एक पण योजना चालू नाहीत. किंवा त्यांना मानधन पण मिळत नसल्यामुळे त्यांना शोध पत्रकारिता करते वेळेस स्वतःच्या खिशातून पैसे खर्च करून आपल्या मोटारसायकल मध्ये पेट्रोल भरुन एखाद्या घटनेची माहिती मिळवण्यासाठी जावे लागते... आणि माहिती घेण्यासाठी तासंतास थांबावे लागले नंतर आपल्या वर्तमानपत्रांमध्ये उद्या बातमी छापून यावे यासाठी मोबाईल फोन वर सुद्धा पैसे खर्च करावे लागते त्यामुळे ग्रामीण भागातील व शहरी भागातील पत्रकार बांधवांना आर्थिक कळ सोसावी लागत आहे.त्यासाठी महाराष्ट्र राज्य शासनाने महाराष्ट्रातील पत्रकार बांधवांकडे विशेष लक्ष देऊन त्यांच्या समस्या जाणून घेऊन प्रत्येक पत्रकार बांधवांसाठी दरमहा ६०००/- रुपये मानधन देण्यात यावे अशी मागणी पत्रकार सिद्धार्थ कांबळे,कुंडलवाडीकर यांनी एका निवेदनाद्वारे मा.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे महाराष्ट्र राज्य यांच्याकडे केली आहे.

जिल्ह्यातील अतिवृष्टी मध्ये झालेल्या शेतकऱ्यांना मिळणार पिक विमा

हिंगोली विधानसभेचे आ.तानाजीराव मुटकुळे यांच्या प्रयत्नाला यश

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

सेनगाव | महादेव हरण



हिंगोली जिल्ह्यांमध्ये झालेल्या अतिवृष्टीत शेतकऱ्याचे मोठे नुकसान झाले होते यामध्ये सोयाबीन कापूस तूर मूग उडीद हळद व आधी पिकांचा समावेश होता आणि शेतकऱ्यांनी पीक विमा भरून सुद्धा शेतकऱ्यांना मदत मिळाली नव्हती परंतु आता हिंगोली विधानसभेचे आमदार तानाजीराव मुटकुळे यांनी कृषिमंत्री व मुख्यमंत्री पिक विमा कंपनीला लेखी निवेदन दिले होते ,या निवेदनाची दखल घेऊन हिंगोली जिल्ह्याकरिता ३,०७ लाख शेतकऱ्यांना मिळणार पीक विम्याचा लाभ हिंगोली जिल्ह्यातील शेतकऱ्याची अतोनात नुकसान झाले होते आणि शेतकरी पिक विमा पासून वंचित राहिला होता परंतु आता हिंगोली विधानसभेचे आमदार तानाजीराव मुटकुळे यांनी शेतकऱ्यांच्या पिक विमा संदर्भात लेखी निवेदन दिले होते तर हिंगोली जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात पीक विमा मिळण्याची शक्यता आहे,

विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे जिल्हा अधिवेशन

बुलडाणा जिल्ह्यातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

देऊळगावराजा | प्रतिनिधी

विदर्भ माध्यमिक शिक्षक संघ संलग्न महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षक महामंडळ मुबई, देऊळगाव राजा येथे २२ सप्टेंबर २०२४ रोज रविवारला सकाळी ११.०० वाजता अस्मिता लॉन्स, बसस्टँड जवळ,सातेफळ रोड देऊळगावराजा येथे बुलडाणा जिल्हा अधिवेशन आयोजित केले आहे.

विदर्भ माध्यमिक शिक्षक संघ ही संघटना माध्यमिक शिक्षकांवर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध सातत्याने व समर्थपणे लढणारी व शिक्षकांच्या समस्या तडीस लावणारी एकमेव व जुनी संघटना आहे. या संघटनेला अभ्यासू निस्पृह व कुशल नेतृत्व असल्याने ही संघटना सतत कार्यरत आहे. तेव्हा बुलडाणा जिल्ह्यातील सर्व सदस्यांनी पदाधिकाऱ्यांनी व संघटनेचा एक पाईक या नात्याने आवर्जून उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

या जिल्हा अधिवेशनाचे अध्यक्षस्थानी माजी शिक्षक आमदार व्ही यु डायगव्हाणे, उदघाटक शिक्षक आमदार सुधाकर अडबाले,प्रमुख उपस्थिती पदवीधर आमदार धीरज लिंगाडे, प्रांतध्यक्ष अरवींद देशमुख , माजी प्रांतध्यक्ष श्रावण बरडे, विभागीय कार्यवाह एम डी धनरे, उपाध्यक्ष जयदीप सोनखासकर, उपाध्यक्ष विजय ठोकळ, विभागीय कार्यवाह बाळासाहेब गोटे,विशेष उपस्थिती राज्यध्यक्ष संतोष राऊत, विकास टोने, रमेश जोल्हे, प्रकाश भूमकाळे, नदीम पटेल, सत्कारमूर्ती व्ही बी टोंगे, विनोद संगीतराव, दादाराव कदम, राज्यपुरस्कार प्राप्त शिक्षक साईनाथ चांदापुरे, संदीप कोल्हे, दीपक पडोळे, सुजित ठाकरे, उपस्थित राहणार आहे.

ईद-ए-मिलाद निमित्ताने मा.मंत्री हर्षवर्धन पाटील यांनी दिल्या शुभेच्छा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

इंदापूर | बबनराव धायतोंडे

इस्लाम धर्माचे संस्थापक हजरत मोहम्मद पैगंबर यांच्या जयंतीनिमित्त आज राष्ट्रीय सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष व माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांनी इंदापूर येथील दर्गा मस्जिद या ठिकाणी जाऊन दर्ग्यावर चादर चढवली व उपस्थित सर्व मुस्लिम बांधवांना ईद च्या निमित्ताने शुभेच्छा दिल्या.

हर्षवर्धन पाटील म्हणाले की इस्लाम धर्माचे संस्थापक हजरत मोहम्मद पैगंबर यांनी संपूर्ण जगासाठी शांततेचा संदेश दिला त्यांच्या जयंती निमित्ताने मी सर्वांना शुभेच्छा देतो.यावेळी सर्व मुस्लिम बांधवांनी मोठ्या उत्साहात हर्षवर्धन पाटील यांचे स्वागत केले तसेच त्यांच्याशी संवाद साधला.

झाडे लावा झाडे जगवा

चारोळी

मनाच्या गाभाऱ्यात
संवेदना जपून ठेव
तरच भेटेल तुला
माणसा माणसातील देव.

रंजना सानप
मायणी (सातारा)

सकाळचे प्रदूषण कमी झाले पाहिजे-मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

मुंबई (वृत्तसंस्था)

सकाळी होणारे प्रदूषण कमी व्हायला पाहिजे, असे म्हणत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांना टोला लगावला आहे. राज्यस्तरीय स्वच्छता अभियान पंधरवड्याचा शुभारंभ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत झाला. यावेळी ते बोलत होते.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते राज्यस्तरीय स्वच्छता अभियान पंधरवड्याचा शुभारंभ करण्यात आला. या अभियानात मुख्यमंत्री शिंदे यांनी स्वतः सहभाग घेत स्वच्छता केली.

कृत्रिम प्रतिभेची चमक दीर्घकाळ टिकत नसते–प्रा.मधुकर जाधव

संत भगवान बाबा महाविद्यालयात मराठी भाषा अभ्यास मंडळ उद्घाटन संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

सिंदखेड राजा । प्रतिनिधी

प्रतिभा ही आपल्यामध्ये निसर्गतः असावी लागते. अथक प्रयत्नाच्या माध्यमातून आपण त्या प्रतिभेचा विकास करू शकतो. परंतु कृत्रिम प्रतिभा असेल तर त्या प्रतिभेची चमक दीर्घकाळ टिकत नसते, असे प्रतिपादन श्री व्यंकटेश महाविद्यालय, देऊळगाव राजा येथील मराठी विभागप्रमुख प्रा. मधुकर जाधव यांनी केले. स्थानिक संत भगवान बाबा कला महाविद्यालय, सिंदखेड राजा येथे मराठी विभागाच्या वतीने आयोजित मराठी भाषा अभ्यास मंडळ उद्घाटन समारोह प्रसंगी उद्घाटक म्हणून ते बोलत होते. याप्रसंगी उद्घाटन समारंभाचे अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ. किशोर वळसे यांची उपस्थिती होती. व्यासपीठावर विभागप्रमुख डॉ. पंढरी डोईफोडे व डॉ. शिल्पा काकडे उपस्थित होते.

संत भगवान बाबा यांच्या प्रतिमेस अभिवादन करून मराठी भाषा अभ्यास मंडळाचे उद्घाटन करण्यात आले. पुढे बोलताना प्रा. मधुकर जाधव यांनी मराठी भाषा आणि साहित्य हे आपल्या जीवनात किती महत्त्वाचे आहे, याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. साहित्याच्या माध्यमातून आपण आपले व्यक्तिमत्व विकसित करू शकतो तसेच भाषेच्या माध्यमातून आपण वक्ता म्हणून यश मिळवू शकतो, असे मत जाधव यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. किशोर वळसे यांनी मराठी साहित्य आपणास ई-बुक, ऑडिओ बुक मध्ये सुद्धा उपलब्ध आहे. त्यामुळे आपण तंत्रज्ञानाचा वापर करून पुस्तकं वाचू शकतो सोबतच ऐकू सुद्धा शकतो. अशा या नवनवीन तंत्रज्ञानाचा आपण सदुपयोग केला पाहिजे, असे आवाहनही त्यांनी केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक विभागप्रमुख डॉ. पंढरी डोईफोडे यांनी केले, तर सूत्रसंचालन डॉ. शिल्पा काकडे यांनी केले. उपस्थितांचे आभार डॉ. संगीता वळसे यांनी मानले. या कार्यक्रमासाठी विद्यार्थी प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पिक विमा कंपनीकडून शेतकऱ्याची दिशाभूल शेतकऱ्याला मिळाला फक्त १०% टक्के पिक विमा

लोकनेता न्यूज नेटवर्क

संपूर्ण सिंदखेड राजा , देऊळगाव राजा तालुक्यामध्ये शेतकऱ्यांना खरीप पिक विमा कपाशीचा अवघ्या फक्त १० ते २० टक्क्यांनी मिळत आहे खरीप जवळपास ९० ते ९५ टक्के शेतकऱ्यांना अद्याप पिक विमा मिळाला नाही जो काही मिळाला तोही शेतकऱ्यांच्या तोंडाला पान फुटल्यासारखा आणि शेतकऱ्याला व्यतीत आणणारे आहे

२६/ ११/२०२३ रोजी सिंदखेड राजा तालुक्यासह संपूर्ण बुलढाणा जिल्ह्यामध्ये अति नुकसान गारपीट झाली होती त्या गारपिटीची पाहणी करण्यासाठी बुलढाणा लोकसभेचे विद्यमान खासदार श्री प्रतापरावजी जाधव साहेब केंद्रीय मंत्री सिंदखेड राजा मतदारसंघाचे आमदार डॉक्टर राजेंद्रजी शिंगणे साहेब विधानसभा विरोधी पक्ष नेते विजय वडेट्टीवार साहेब आणि विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते श्री अंबादासजी दानवे साहेब पालकमंत्री ,श्री दिलीप वळसे पाटील साहेब हे सर्व सत्तेतले आणि विरोधक सर्व नेते मंडळी पळसखेड चक्का तालुका सिंदखेड राजा जिल्हा बुलढाणा या ठिकाणी पाहणी करण्यासाठी आले आणि शेडनेट बीज उत्पादक शेतकऱ्यांना मदत मिळेल अशी अपेक्षा व्यक्त केली आणि येथील संपूर्ण शेतकऱ्यांची १००% टक्के नुकसान झाली असे सर्वांनी जाहीर केले आणि त्या ठिकाणी ,जिल्हा अधिकारी, जिल्हा कृषी अधीक्षक, आणि पिक विमा जिल्हा प्रतिनिधी, हे सुद्धा उपस्थित होते अद्याप पीक विमा कंपनीने फक्त १० % ते २०% पर्यंत शेतकऱ्यांना पिक विमा देत आहे म्हणजे शेतकऱ्याच्या अतोनात नुकसान होऊन तर मदत मिळत नसेल तर पिक विमा कंपनी ही कोणासाठी जिल्ह्यात काम करत आहे या जिल्ह्यांमध्ये हा प्रश्न शेतकऱ्यांच्या मनामध्ये उपस्थित झाला. याच प्रश्नसंदर्भामध्ये शेतकरी नेते श्री रविकांत तुपकर साहेब व शेतकरी योद्धा कृती समिती बुलढाणा जिल्हा व बळीवंश या संघटनेमार्फत श्री बालाजी सोसे, गजानन जायभाये यांनी अन्नत्याग आमरण उपोषण करून सुद्धा शेतकऱ्याला न्याय मिळाला नाही आणि म्हणून या परिसरातील शेतकऱ्यांची तीव्र नाराजी या ठिकाणी व्यक्त करण्यात येत आहे शेतकरी योद्धा कृषी समितीचे समन्वयक श्री बालाजी सोसे यांनी राज्य सरकारवर गंभीर आरोप केले पिक विमा ही कंपनी फक्त जिल्ह्यातील सत्ताधारी नेते मंडळींचा पोट भरण्यासाठी आणि जिल्ह्यातील सर्व आमदारांचे आणि खासदारांचे पोट भरण्यासाठी आहे का मंग सर्व मंडळी का हा प्रश्न उपस्थित करत नाही आणि

सरकारकडे का लावून धरत नाही सर्वसामान्य शेतकऱ्यांसाठी ही पीक विमा कंपनी काम करत नाही ज्या ठिकाणी राज्य सरकारने शेतकऱ्याला अतिवृष्टीची मदत जाहीर करून दिली ती मदत जवळपास सिंदखेड राजा, देऊळगाव राजा तालुक्यांमध्ये ५०% पासून तर ९८% पर्यंत ती नुकसान झाल्याचा अहवाल राज्य सरकारकडे प्राप्त झाला आणि राज्य सरकारने त्या पद्धतीने मदत दिली मग पिक विमा कंपनी १० ते २० % टक्क्यांनी मदत का देती हा प्रश्न संपूर्ण बुलढाणा जिल्ह्यातील नेते मंडळींनी उपस्थित करायला पाहिजेत होता पण सर्व नेते मंडळी गप्प बसले आहे राज्य सरकारने ठरवल्यानंतर पिक विमा कंपनीला टक्केवारी ठरवण्याचा अधिकार नसावा आणि राज्य सरकारच्या नुकसान झाल्याचे टक्केवारीनुसारच पिक विमा मिळाला पाहिजेत होता, म्हणून आता

आता शेतकऱ्यांनी जर निर्णय घेतला तर तुम्हाला येणाऱ्या विधानसभेमध्ये जड जाईल कारण तुम्हाला शेतकऱ्याच्या पिक विम्याच्या प्रश्ना बद्दल जर बोलायचं नसेल तर सर्व सामान्य गोरगरीब शेतकऱ्यांच्या दारामध्ये मतदान माघाला यायचं नाही नाहीतर शेतकरी शेतकऱ्यांच्या दारामध्ये रूमनं घेऊन उभा राहील मग तुम्हाला पळती भुई कमी होईल

म्हणून सर्व राजकीय पक्षांना मी विनंती करतो शेतकऱ्याच्या पिक विमा बद्दल सर्वांनी एकत्र येऊन आवाज उठवा नक्कीच पीक कंपनीला जाग येईल आणि तसेच शेतकरी मित्र श्री दिलीप चौधरी व शेतकरी योद्धा कृती समिती समन्वयक श्री बालाजी सोसे यांच्या नेतृत्वाखाली ३० तारखेच्या आत दिलेल्या निवेदनामधील आमच्या मागण्या पूर्ण न झाल्या पुकारलेलं आत्मदहन हे आंदोलन होणारच

शेतकऱ्याला न्याय मिळेल नाहीतर तुम्ही फक्त शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन फोटो शूट करण्यासाठी तुम्ही सर्व तुमचे दौरे असतात हे सर्व सामान्य शेतकऱ्याच्या लक्षात येईल असं मत शेतकरी योद्धा कृती समितीचे समन्वयक श्री बालाजी सोसे यांनी व्यक्त केलं

कार्यसम्राट आ.तान्हाजीराव मुटकुळे साहेब ह्याचं,कार्य आणि कर्तृत्व



रुपेश महाजन

लोकनेता न्यूज नेटवर्क

जनमानसांत हृदयसिंहासनी विराजमान,कार्यकर्तृत्वाच्या उत्तुंग शिखरावर आसनस्थ,सर्व सामान्यांच्या प्रश्नांची जाण असणारे, हिंगोली विधानसभा मतदारसंघाचे भाग्यविधाते आदरणीय कार्यसम्राट आमदार तान्हाजीराव मुटकुळे साहेब यांनी हिंगोली विधानसभेचे आमदार या नात्याने आपल्या विकासपर्वाच्या दहा वर्षांत देदीप्यमान कार्य केले आहे.गोरगरिबांना या योजनेच्या साहाय्याने मदतीचा नुसता हात आणि आधारच दिला नाही, तर प्रत्येक कुटुंबाशी आपुलकीचा जिव्हाळा निर्माण केला. निव्वळ प्रासंगिक न राहता, आवर्जून विचारपूस करीत या कुटुंबीयांना परिवार म्हणून जोडले. यापुढेही कोणतीच कमतरता भासणार नाही, याची जातीने काळजी घेऊन जनसामाण्याची अखंड ज्योत कार्यसम्राट आमदार साहेब हे कायम ठेवत राहतील ह्यात शंका नाही. विकासपर्वाच्या कार्यकाळात हिंगोली मतदारसंघाचा चेहरामोहराच बदलून टाकला. डांबरीकरणामुळे खड्डेग्रस्त नागरिकांसाठी रस्त्यांचे काँक्रिटीकरण करुन मतदारसंघात सर्वत्र रस्त्याचे जाळे निर्माण केले. अगदी ग्रामीण भागांतसुद्धा काँक्रीटचे रस्ते देऊन सर्वांना दिलासा दिला. एक स्वप्न पाहिले होते साहेबांनी! ते म्हणजे, गाव खेड्याच रूपांतर शहरात करायचंकाही कामसुद्धा प्रगतिपथावर आहे. हिंगोली जिल्ह्याच्या कुशीत आणि कयाधू नदीच्या मुशीत वसलेल्या हिंगोलीमध्ये सर्वाधिक झपाट्याने शहरीकरण होत असून, फार मोठ्या प्रमाणावर नागरिक येथे वास्तव्यास येत आहेत. सेनगाव शहरात पिण्याच्या,पाण्याची अत्यंत गंभीर समस्या होती. आमदार झाल्यावर सर्वात आधी पिण्याच्या पाण्याची समस्या सोडवीन,असा शब्द हिंगोली विधानसभेचे कार्यसम्राट आमदार तान्हाजीराव मुटकुळे साहेबांनी दिला होता.आज शहरातील घराघरांत नळ पाणी योजनेचे स्वच्छ पाणी येते. त्यामुळे माता-भगिनींना मोठा दिलासा मिळाला आहे. म्हणूनच आमदार साहेबांचा उल्लेख करावासा वाटतो,अभिमानाने दिलेला शब्द पाळणारा नेता'असा करतो.साहेबांच्या कारकिर्दीत हिंगोली जिल्ह्याचा चेहरामोहराच बदलला असच आपल्या हातून विकासाचा व समाजसेवेचा रथ अविरतपणे ओढण्याची नवनवीन कल्पना देवो हीच देवाधी देव चरणी प्रार्थना करून पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा व अभिनंदन करतो.

अंजनी ते बामणी रस्त्याच्या फुलाचे काम त्वरित करा

अन्यथा अंजनी व बामणी येथील गावकऱ्यांना घेऊन आंदोलन करु

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

बिलोली । गौतम गावंडे

बिलोली तालुक्यातील मौजे अंजनी व बामणी या दोन्ही गावाला जोडला जाणारा रस्तावर चा फुल सततच्या पावसामुळे पुर्ण खरडून गेला आहे त्यामुळे अंजनी, डोणगांव येथील विद्यार्थी रोज स्कूल बसने प्रवास करत आहेत त्यामुळे त्यांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे अंजनी फाटा ते बामणी पर्यंत चा रस्ता करण्यासाठी चार-पाच वर्षाचे कॉन्ट्रॅक्ट स्वामी नावाच्या व्यक्तीला देण्यात आले होते पण तो अर्ध्यातच काम सोडून पसार झाला आहे याकडे सार्वजनिक बांधकाम विभागाने गांभीर्याने लक्ष देऊन या पुलाचे काम तात्काळ करण्यात यावे असे निवेदन बिलोलोच तहसीलदार यांना देण्यात आले अन्यथा आंदोलन करण्यात येईल असा इशारा स्वाभिमानी बिग्रेड संघटना युवक जिल्हाध्यक्ष दत्ता कांबळे यांनी दिला आहे.

लोकनेता न्यूज नेटवर्क

आदराने ताठ मान करून उभ राहायचं असेल तर वारंवार विचारांची देवाण घेवाण झाली पाहिजे आणि विचारांची देवाण घेवाण करण्यासाठी योग्य माणसाची निवड करण्याचे ज्ञान मिळत असते ते आपल्या शाळेतून, मागील महिन्यात मिळालेल्या समाजप्रबोधनकार राष्ट्रसंत भगवान बाबा महाराष्ट्र भूषण पुरस्काराचे श्रेय सर्वांसोबत आपल्याला घडवणाऱ्या शाळेला नक्कीच जात. आपल्या शाळेचा विद्यार्थ्याला मिळाला पुरस्काराचा आनंद हा आपल्या गुरुजनांना नक्कीच मिळत असतो. आपले देखील भाग्य अस म्हणायला हरकत नाही. आपण मातृतीर्थ सिंदखेड राजा नगरीत जन्मलो केवळ जन्मलो नाही तर इथेच शिकलो याच गोष्टीचं भान आपण नेहमी ठेवायला पाहिजे असं मला वाटतं.. आज हल्ली छोट्या गोष्टीसाठी निष्ठा विकणारे लोक आहेत. आपण पण तेच करायचे का. तर नाही ना. आपण अभिमानाने सांगू शकलो पाहिजेत की मी आदर्श शाळेचा विद्यार्थी आहे. ह्याच मराठी शाळेने आम्हाला जगायला शिकवलं ते आजतागत आणि आयुष्यभर....

पत्रकारिताची सुरुवात देखील तरुण भारत ला प्रतिनिधी म्हणून अनेक वर्ष काम केलेलं आमचे वर्ग शिक्षक मापरी सरांच्या मार्गदर्शनामधून झाली आणि त्याच पत्रकारिता ने इथ पर्यंत आलोय.

आज खूप दिवसा नंतर जिथे हक्काचस्थान मिळत अशा माझा शाळेला जाऊन सरांसोबात सल्लामसलत केली. शाळेत थोडा वेळ थांबल की मन प्रसन्न होऊन रमून जात आणि ते केवळ काही वेळा करताच नव्हे.. कारण दिवस कितीही पुढे निघून गेले तरी आपण शाळेसाठी एक विद्यार्थीच असतो. हे मात्र खरे.

स्वराज्य संघटनेचे विकास जाधव यांचा एल्गार, नगर परिषदेच्या इमारतीवर चढून आंदोलन

भोकरदन शहराला जुई धरणातून पाणीपुरवठा करण्याची मागणी

लोकनेता न्यूज नेटवर्क **दानापूर । राम शिंदे**

भोकरदन शहराला जुई धरणातून पाणीपुरवठा तात्काळ करण्यात यावा या मागणीसाठी स्वराज्य संघटनेचे जिल्हाध्यक्ष विकास जाधव यांनी बुधवारी दिनांक १८ दुपारपासून भोकरदन नगर परिषदेच्या इमारतीवर ठाण मांडलं आहे रात्री उशिरापर्यंत त्यांच्या मनधरणीसाठी नगरपरिषद प्रशासनाकडून प्रयत्न सुरू होते ऑगस्ट महिन्यात झालेल्या दमदार पावसामुळे जुई धरणाला अकरा ते बारा फूट पाणी आले त्यामुळे भोकरदन शहरवासीयांच्या पाण्याच्या आशा पल्लवीत झाल्या मात्र नगरपालिकेच्या ढिसाळ कारभारामुळे शहराला अजूनही जुई धरणातून पाणीपुरवठा झालेला नाही नगरपरिषेकडून याबाबत पाणीपुरवठ्याच्या मोटरी मध्ये तांत्रिक अडचणी असल्याचे सांगण्यात आले..

भोकरदन शहरात पाणी प्रश्नासाठी शहरवासीय गेल्या काही महिन्यापासून अनेक अडचणीचा सामना करत आहे मात्र पालिका याकडे लक्ष देत नसल्याने शहरवासीयांमधून संताप व्यक्त होत आहे बुधवारी झालेल्या या आंदोलनाला शहरातील अनेक पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी सर्वसामान्य नागरिकांनी विकास जाधव यांना पाठिंबा देऊन त्यांच्या आंदोलना ठिकाणी भेट दिली..विकास जाधव यांच्या आंदोलनाची नगर परिषदेने तात्पुरती दखल घेऊन गुरुवार ता. १९ पासून पाणीपुरवठा करण्याचे आश्वासन दिले आहे मात्र विकास जाधव यांनी दुपारपासून इमारतीवर ठाणा मांडले व खाली उतरण्यास तयार नव्हते रात्री उशिरापर्यंत माजी नगराध्यक्ष राजाभाऊ देशमुख शहरातील प्रतिष्ठित नागरिक नगरपरिषद कार्यकारणी यांनी त्यांची समजूत घालण्याचा प्रयत्न केला त्यानंतर विकास जाधव यांनी आंदोलन मागे घेतले.

श्री.गणेश विसर्जन मिरवणूक उत्साहात पार

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

देऊळगाव राजा । प्रतिनिधी

शिक्षण प्रसारक मंडळ चिखली द्वारा संचालित स्थानिक दीनदयाल विद्यालय व कनिष्ठ कला आणि विज्ञान महाविद्यालयाची श्री.गणेश विसर्जन मिरवणूक आज मंगळवार दि.१७ सप्टेंबर २०२४ रोजी उत्साहात पार पडली.

विसर्जन मिरवणूकीत विद्यालय तथा कनिष्ठ महाविद्यालयातील वर्गशिक्षकांनी आपापल्या वर्गाचे स्वतंत्र देखावे तयार केले होते.विसर्जन मिरवणूकीत पुढीलप्रमाणे देखावे सादर करण्यात आले.११वी १२वी कला आणि विज्ञान ढोल पथक,१०ड अष्टविनायक दर्शन, ६अ पर्यावरण संरक्षण,८अ सिंधुताई सपकाळ यांचे योगदान,१०अ विविधतेत एकता,९अ तिरुपती बालाजी दर्शन,९ब सायकल चालवा पर्यावरण वाचावा,७क ग्रंथ हेच गुरू,९क स्त्री संरक्षण काळाची गरज, ६ब शिक्षणाची वारी,१०ब मतदान जनजागृती अभियान,५अ,ब पर्यावरण वाचवा प्रदूषण टाळा,८ब कावड यात्रा नारी वंदन,९ड योग एक आदर्श जीवन शैली,७ब कृष्णलीला,८ड महाराष्ट्र शासनाच्या विविध कल्याणकारी योजना,७अ महाराष्ट्रातील वारकरी परंपरा,८क जगाचा पोशिंदा शेतकरी, १०क महाराष्ट्रातील लोकपरंपरा,६क माझा देऊळगांव राजा स्वच्छ देऊळगांव राजा याप्रमाणे एकूण २० देखाव्याचे सादरीकरण करण्यात आले. यावेळी संपूर्ण शहर गणपती बाप्पा मोरयाच्या गर्जनेने दुमदुमले.

देऊळगाव राजा गणेश उत्सव प्रोत्साहन समितीचे अध्यक्ष मा.श्री.राजेशजी भुतडा यांच्या अध्यक्षतेखालील निरीक्षण समितीने या सर्व देखाव्याचे विद्यालयात येऊन निरीक्षण केले. या विसर्जन मिरवणूकी दरम्यान माजी आमदार मा. श्री.शशीकांतजी खेडेकर साहेब,विभागीय पोलीस अधीक्षक मनीषताई कदम,प्रोत्साहन समितीचे सदस्य पत्रकार श्री. सूरज गुप्ता,राजेश इंगळे, मा.काशीफ कोटकर,प्रभाकर खांडेभराड,पत्रकार सौ.सुषमाताई राऊत,अँड.घनश्यामजी भाला,गोविंदराव झोरे,वसंतअप्पा खुळे,विनोद जैस्वाल,सन्मती जैन,संचित धन्नावत तसेच शिप्रमंचे संचालक तथा विद्यालयाचे पालक संचालक श्री.बाबासाहेब मिनासे, मा. अशोक भाऊ कोटेचा,सल्लागार श्री.त्र्यंबकराव जायभाये ,

सर्व स्थानिक सल्लागार आणि संचालक उपस्थित होते.

या विसर्जन मिरवणूकीत प्राचार्य श्री.एस.बी.गारडे सर, पर्यवेक्षक श्री.एस.एन.व्यास सर तसेच विद्यालयातील श्री.गणेश उत्सव समितीचे प्रमुख प्रा.श्री पी.बी.ठाकूर सर यांच्यासह प्राध्यापक - प्राध्यापिका,शिक्षक - शिक्षिका तसेच शिक्षकेतर कर्मचारी बंधू भगिनी सहभागी झाले होते विद्यार्थ्यांना महाप्रसादाचे वितरण करून मिरवणुकीची सांगता झाली .

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (UGC) महिलांच्या सुरक्षे साठीच्या मार्गदर्शक तत्त्वांची अंमलबजावणी होणे आवश्यक

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

पुणे । प्रतिनिधी

२० सप्टेंबर २०२४ रोजी पुण्यातील सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात महिला सुरक्षितता व शिष्यवृत्ती या विषयावर आयोजित कार्यशाळा अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या वतीने आयोजित या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी माननीय मंत्री चंद्रकांतदादा पाटील असणार आहेत. या कार्यशाळेत 'विशाखा मार्गदर्शक तत्त्वे,' 'लैंगिक छळ प्रतिबंध कायदा, २०१३' आणि विद्यापीठ अनुदान आयोग (UGC) यांनी २ मे २०१६ रोजी महिलांच्या सुरक्षेसाठी दिलेली मार्गदर्शक तत्त्वे यावर सखोल चर्चा होईल.

या कार्यशाळेत विविध विद्यापीठे व महाविद्यालयातील तज्ञ, कायदेतज्ज्ञ आणि सेवाभावी संस्थांचे प्रतिनिधी सहभागी होणार आहेत. ते महिलांच्या सुरक्षिततेसाठीच्या उपाययोजनांवर मार्गदर्शन करतील. त्या अनुषंगाने UGC ने जाहीर केलेली महिलांच्या सुरक्षेसाठीची मार्गदर्शक तत्त्वे या लेखात सविस्तर दिली आहेत.

महिला सुरक्षा विषयक मार्गदर्शक तत्त्वे:

१. सुरक्षा धोरणे (Safety Policies)

शैक्षणिक संस्थांमध्ये महिलांच्या सुरक्षिततेसाठी व्यापक सुरक्षा धोरणे तयार करणे आवश्यक आहे. धोरणांमध्ये महिलांच्या सुरक्षेशी संबंधित सर्व मुद्द्यांचा विचार केला पाहिजे.

सर्वसमावेशक सुरक्षा धोरण: प्रत्येक शैक्षणिक संस्थेने महिलांसाठी सुरक्षिततेच्या सर्व बाबी समाविष्ट करणारे धोरण तयार करावे. यात सुरक्षेच्या मूलभूत उपाययोजना आणि आपत्कालीन परिस्थितीत महिलांना मदत मिळवण्याच्या उपायांचा समावेश असावा.

२. सुरक्षा व्यवस्थापन (Safety Management)

सुरक्षितता धोरणांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी सुरक्षा व्यवस्थापन महत्त्वाचे आहे.

CCTV कॅमेरे आणि सुरक्षा गार्ड्स: शैक्षणिक संस्थांनी परिसरात उउढत कॅमेरे बसवणे आणि सुरक्षा गार्ड्सची नेमणूक करणे आवश्यक आहे. यामुळे परिसरात घडणाऱ्या घटनांवर लक्ष ठेवता येईल.

३. प्रशिक्षण कार्यक्रम (Training Programs)

महिलांच्या सुरक्षिततेशी संबंधित धोरणे आणि उपाययोजना लागू करण्यासाठी प्रशिक्षण महत्त्वाचे आहे.

सुरक्षा प्रक्रियेचा परिचय: विद्यार्थ्यांना आणि कर्मचार्यांना आपत्कालीन परिस्थितीत काय करावे हे शिकवणे आवश्यक आहे.

४. तक्रार निवारण (Complaint Redressal)

महिला सुरक्षिततेसाठी प्रभावी तक्रार निवारण यंत्रणा असणे आवश्यक आहे.

आंतरआस्थापन समितीची स्थापना: प्रत्येक संस्थेने एक स्वतंत्र आंतरआस्थापन समिती स्थापन करणे आवश्यक आहे, जी लैंगिक छळाच्या तक्रारींची तपासणी करेल.

५. UGC च्या शिफारसी (UGC Recommendations for Safety Measures)

UGC ने महिलांच्या सुरक्षेसाठी दिलेल्या शिफारसींची अंमलबजावणी करणं आवश्यक आहे.

निष्कर्ष: महिलांच्या सुरक्षिततेसाठी णत्रछ च्या मार्गदर्शक तत्त्वांची अंमलबजावणी शैक्षणिक संस्थांमध्ये प्रभावीपणे होणे आवश्यक आहे. या तत्त्वांच्या अंमलबजावणीने महिलांना सुरक्षितता आणि संरक्षणाची हमी मिळू शकते.

–डॉ.सुवर्णा कराड
प्रदेशाध्यक्ष, वंजारी महासंघ,
महिला आघाडी, महाराष्ट्र राज्य

पुणे करार झाला नसता तर जाती व्यवस्था उद्धवस्त झाली असती–डॉ.शशिकांत पट्टेकर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

बीड । विजय रोडे

पुणे करार झाला नसता तर जाती व्यवस्था उद्धवस्त झाली असती असे प्रतिपादन फुले–आंबेडकरी अभ्यासक डॉ शशिकांत पट्टेकर यांनी स्टुडंट्स फॉर रिकन्स्ट्रक्शन ऑफ सोसायटी आणि फुले–आंबेडकरी अभ्यास समूहाच्या वतीने रविवार दि. १५ सप्टेंबर रोजी सम्राट अशोक सभागृहात प्रेरणा सार्वजनिक वाचनालयाच्या बाजूला थर्मल कॉलनी येथे 'पुणे करार (२४ सप्टेंबर १९३२) : 'गाभा आणि वर्तमान स्वरूप' किंवा पुणे कराराचा धिक्कार वारंवार का करावा ? या विषयावर विशेष साप्ताहिक अभ्यास वर्गाचे आयोजन करण्यात आले होते या वेळी बोलताना केले.

उद्घाटक परळी औष्णिक विद्युत केंद्रांचे सहाय्यक कल्याण अधिकारी शरद राठोड यांनी केले. तर मंचावर प्रमुख अतिथी म्हणून मागासवर्गीय कर्मचारी संघटनेचे बी. एल. वडमारे, उपकार्यकारी अभियंता शिवाजी होटकर, अँड कपिल चिंडालिया, लक्ष्मण वैराळ यांचीही उपस्थिती होती.

पुणे कराराला ९२ वर्षे पूर्ण होत आहेत. अनुसूचित जाती (पूर्वश्रमीचे अस्पृश्य) व अनुसूचित जमाती (पूर्वाश्रमीचे आदिवासी) यांच्यावर हा पुणे करार लादून, त्यांच्यामध्ये व्यवस्थेचे चमचे, दलाल निर्माण केले तसेच पुणे करारामुळे डउ/डढ ची अस्पृश्यता आजही बरकरार राहिली आहे. पुणे करार अप्रत्यक्षरित्या ओबीसी समुदायाशी लागू आहे. कार्यक्रमास उपकार्यकारी अभियंता संदीप गायकवाड, विशाल थोरात, श्याम इंगळे, अतिरिक्त कार्यकारी अधियंता निखिल मेश्राम, संयुक्त उत्सव समितीचे कार्याध्यक्ष महेंद्र रोडे, नगरसेवक केशव गायकवाड, महादेव मस्के, शिवाजी बनसोडे, ज्ञानोबा मस्के, निलावाड सर, कनिष्क कलासरे , चेअरमन निशांत साळवे, प्रशांत मस्के, महेश मुंडे, पत्रकार रानबा गायकवाड, संपादक नितीन ढाकणे, प्रशांत कदम, आकाश देवरे आदींची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भगवान साकसमुद्रे तर उपस्थितांचे आभार सचिन राऊत यांनी मानले.

गावठी कट्टासह सराईत गुन्हेगार जेरबंद श्रीरामपुर शहर पोलिसांची कामगिरी; ३२ हजारांचा मुद्देमाल हस्तगत

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

अहमदनगर । प्रतिनिधी

श्रीरामपूर ते संगमनेर जाणाऱ्या रोडवर उभ्या असलेल्या सराईत गुन्हेगाराकडे गावठी कट्टा आढळून आल्याने त्याला श्रीरामपूर शहर पोलिसांनी अटक केली आहे. याबाबत सविस्तर असेही की, दि. १६ सप्टेंबर रोजी रात्री १०:४० वाजेच्या दरम्यान पोलिस निरीक्षक नितीन देशमुख यांना गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, श्रीरामपूर ते संगमनेर जाणाऱ्या रोडवरील जय भोले हॉटेलच्या बाजुला पृथ्वी ढाव्यासमोर, एक भगव्या रंगाचा स्पोर्ट टीशर्ट व बरमुडा पॅन्ट घातलेला एक इसम कमरेला गावठी कट्टा लावुन बसलेला आहे. तुम्ही आता गेल्यास तो मिळून येईल, अशी खात्रीशीर बातमी मिळाली आहे. तुम्ही सदर ठिकाणी जावून बातमीप्रमाणे खात्री करुन त्याच्यावर कारवाई करा. असा तोंडी आदेश दिल्याने पोलीस पथक लागलीच दोन पंचांसह सदर ठिकाणी जावुन खात्री केली असता एक भगव्या रंगाचा स्पोर्ट टीशर्ट व बरमुडा पॅन्ट घातलेला एक इसम बसलेला आढळून आल्याने त्याच्यावर छापा टाकुन त्यास जागीच पकडले.

सदरील आरोपीला नाव–गाव विचारले असता त्याने त्याचे नाव महेश रामकरण विश्वकर्मा (वय ३६ वर्ष, रा. स्वामी समर्थ कॉलनी सुतगिरणी रोड श्रीरामपुर, जि. अहमदनगर) असे असल्याचे सांगितले. त्यास पोलीस उपनिरीक्षक समाधान सोळंके यांनी पोलीस व पंचांची ओळख सांगुन त्याची अंगझडती घेतली. यावेळी त्याच्या ३२ हजार रुपये किंमतीचा एक गावठी कट्टा सिल्व्हर पांढऱ्या रंगाचा, काळया प्लॅस्टीक हॅण्ड ग्रिफवर स्टार कोरलेला असलेला मॅगझीन आढळून आले. यावेळी संबंधित सराईत आरोपीला गावठी गट्टयासह ताब्यात घेवुन त्याच्यावर श्रीरामपूर शहर पोलीस स्टेशन येथे गुरनं. ८९९/२०२४ भारतीय हत्यार कायदा कलम ३,२५ प्रमाणे गुन्हा दाखल करुन त्याला अटक करण्यात आली आहे. सदरील कारवाई पोलीस अधीक्षक राकेश ओला, अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. बसवराज शिवपुजे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांच्या पथकाने केली. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक रामाधान सोळंके हे करीत आहेत.

शिंदी येथे बुद्ध आणि त्यांचा धम्म ग्रंथाचा समारोप

ठाणेदार करेवाड यांच्या हस्ते खीर वाटप

धम्म शिवाय पर्याय नाही-प्रा.गजेंद्र गवई

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

सिंदखेड राजा । प्रतिनिधी

वर्षावासानिमित्त सिंदखेडराजा तालुक्यातील शिंदी येथे दि १८ सप्टेंबर रोजी बुद्ध आणि त्यांचा धम्म ग्रंथ वाचनाचा समारोप करण्यात आला,सायंकाळी ६ वाजता झालेल्या कार्यक्रमांमध्ये

सर्व उपासक उपासिका महिलांनी पांढरे शुभ्र वस्त्र परिधान करून बुद्ध विहारांमध्ये उपस्थिती लावली होती , बुद्ध विहारासमोर सुंदर रांगोळी काढली होती,सदर झालेल्या कार्यक्रमांमध्ये कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी समाजभूषण अर्जुन गवई ,साखरखेर्डा पोलीस स्टेशनचे ठाणेदार गजानन करेवाड,त्याचबरोबर लोकशाहीर लॉर्ड बुद्धा टीव्ही चॅनेल चे जिल्हा प्रतिनिधी प्राध्यापक गजेंद्र गवई ,शाहीर संघपाल गवई , पोलीस हेड कॉन्स्टेबल नितीन राजे जाधव 'पत्रकार ग्राहक रक्षक समितीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मोरे,सामाजिक कार्यकर्ते राहुल डोंगरदिवे निलेश डोंगरदिवे यांचे प्रमुख उपस्थिती होती,सुरुवातीला ठाणेदार गजानन करेवाड यांचा शाल पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले, त्याचबरोबर नितीन राजे जाधव , अर्जुन गवई गजेंद्र गवई व इतर मान्यवरांचा सुद्धा यावेळी सत्कार करण्यात आला,

तसेच ग्रंथ वाचक बौद्धाचार्य सुनील खंडारे यांनी एका महिन्यापासून ग्रंथाचे वाचन केले त्यांचा सुद्धा ठाणेदार करेवाड यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला,सुखदेव गवई ,यांचा सुद्धा यावेळी सत्कार करण्यात आला, त्याचबरोबर ग्राहक रक्षक समितीच्या विदर्भा अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल ठाणेदार करेवाड यांच्या हस्ते पत्रकार सचिन खंडारे यांचा सुद्धा शिरफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला, त्यानंतर झालेल्या कार्यक्रमांमध्ये शाहीर संघपाल गवई यांनी आपल्या सुंदर आवाजामध्ये भीम गीत सादर केले व कार्यक्रमात रंगत भरली,त्यानंतर प्राध्यापक गजेंद्र गवई यांनी नेहमीच्या शैलीत मंत्रमुग्ध केले त्यांनी चौफेर धम्माचे ज्ञान सांगितले,सुंदर गीत सुद्धा त्यांनी म्हटले त्यांच्या भाषणाला उपस्थितांनी दाद दिली,ठाणेदार करेवाड यांनी सुद्धा मार्गदर्शन करताना सांगितले की कायदा व सुव्यवस्था राखण्याकरता बरेचसे ज्ञान हे ग्रंथामध्ये सुद्धा आहे,त्याचबरोबर समाजभूषण अर्जुन गवई यांनी कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानावरून मार्गदर्शन करताना सांगितले की बुद्ध धम्म शिवाय पर्याय नाही हजारो वर्षापासून धम्म चालत आला आहे आणि आपण सुद्धा चांगले काम करावे असे सांगितले, त्यानंतर ठाणेदार गजानन करेवाड यांच्या हस्ते उपासक–उपासिका यांना खीर वाटप करण्यात आले,

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पत्रकार सचिन खंडारे यांनी केले तर आभार कडूबा खंडारे शिक्षक यांनी केले,कार्यक्रमाला सर्व उपासक उपासिका मोठ्या संख्येने उपस्थित होते .

शहरात जैन धर्मियांकडूनपर्युषण पर्वाची शोभायात्रा संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

लोहा । विशाल घंटे

लोहा शहरामध्ये १००८ वृषभनाथ दिगंबर जैन मंदिर देऊळ गल्ली येथून नागेश्वर मंदिर मार्ग भाजी मंडई बस स्टॅन्ड बीडवई व नगर येथून जैन धर्मियांकडून भगवान महावीराच्या प्रतिमेची भव्य मिरवणूक काढून शोभायात्रा संपन्न झाली जैन धर्मीयांमध्ये पर्युषण पर्वला अतिशय महत्त्व असते या दहा दिवसांमध्ये मंदिर मध्ये भगवंताच्या मूर्तीला रोज ठराविक वेळेला दही दूध तूप विविध प्रकारच्या फळांचा रसाचे अभिषेक होत असतात त्यानंतर पूजाअर्चा होते व रोज रात्री मंगल आरती होत असते त्यामध्ये चढाव बोली होत असते या दहा दिवसांमध्ये महिला पुरुष लहान मुले सुद्धा मोठ्या भक्ती भावाने उपास करत असतात रात्री जेवण व पाणी बिलकुल ग्रहण करत नसतात आणि शेवटच्या दिवशी क्षमा वली पर्व असते ज्यामध्ये जैन धर्मीय उत्तम क्षमा (=जमीच्छामी दुकडम) झालेल्या वर्षभरात त्यांच्याकडून जर कोणाचे मन दुखावले असतील तर त्यांची ते क्षमा मागतात अशाप्रकारे जैन धर्मय या दहा दिवसांमध्ये आपली दिनचर्या पाळतात व शेवटच्या दिवशी महाप्रसादाचे आयोजन असते. हा पर्युषण पर्व साजरा करत असते वेळेस समाजातील सर्व तरुण वयस्क महिला मंडळ लहान बालक हीर हिरेने भाग घेत असतात.

नायगाव विधानसभा डॉ.माधव विभुते यांनी लढवली तर १००% निवडणूक जिंकणार

जनतेचा कौल पण डॉक्टर विभूते हे निवडणूक लढवणार की नाही याकडे जनतेच लक्ष लागले

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

धर्माबाद । साहेबराव दुगाने

८९ नायगाव विधानसभा मतदारसंघातील उगवतं व्यक्तिमत्व डॉक्टर माधव विभुते यांच्या जनसंवाद भेटी दौऱ्याला जनतेतून मोठा प्रतिसाद मिळत असून त्यांनी गेल्या काही महिन्यापासून जनसंवाद भेटीगाठी कार्यक्रम सुरू केला असून त्यांच्या जनसंवाद भेटीला जनतेतून स्फुर्त प्रतिसाद मिळत आहे डॉक्टर माधव विभुते हे गेल्या अनेक वर्षापासून वैद्यकीय अधिकारी म्हणून काम पाहिले अनेक गोरगरीब जनतेची सेवा केली अतिशय क्रिटिकल डिलिव्हरी गरीब कुटुंबातील लोकांना मोफत आरोग्य उपचार विविध योजनेची माहिती देऊन सहकार्य केले ते गेल्या काही दिवसापासून नायगाव उमरी धर्माबाद मतदार संघात जनसंवाद भेटीगाठी च्या माध्यमातून जनतेची संवाद साधत आहेत व जनतेच्या प्रतिक्रिया जनतेमध्ये कोणकोणत्या योजनेची कमतरता आहे भौतिक गरजा पूर्ण झाल्यात का ?रस्ते पाणी वीज या मूलभूत गरजा कडे विशेष लक्ष देत आहेत त्यांना अनेक खडतर संकटाला सामना करावा लागला आहे

डॉक्टर माधव विभुते यांना सर्वधर्मीय जनतेकडून नायगाव विधानसभा लढवावी अशी जनतेतून मागणी होत आहे सर्व धर्मीय समाज बांधवांचे सामाजिक उपक्रम राबवून मतदारसंघात लोकांचे मन जिंकले आहेत. नायगाव विधानसभा मतदारसंघातील अनेक गावातून मतदार व कार्यकर्ते सोशल मीडियाच्या माध्यमातून पसंत करत आहेत प्रत्येक युवा कार्यकर्त्यांना डॉक्टर माधव विभुते नायगाव विधानसभा लढवावी असे वाटत आहे. नायगाव विधानसभा निवडणुकीसाठी उत्सुकानी मोर्च बांधणी देखील सुरू केली असून कोण निवडणूक लढवणार हे मात्र येणारी वेळ सांगू शकेल परंतु उत्सुक असलेल्या मध्ये एक नवीन नाव प्रामुख्याने पुढे येत आहे हे नाव म्हणजे उमरी तालुक्यातील गोरठा गावचे भूमिपुत्र डॉक्टर माधव विभुते होय डॉक्टर महादेव विभुते हे उमरी शहरातच नव्हे तर अवघ्या नांदेड जिल्ह्यात त्यांच्या नावलौकिक असून नायगाव मतदार संघाचा भौगोलिक नकाशा जर पाहिला तर नायगाव व धर्माबाद यामध्ये उमरी तालुका आहे उमरी तालुका हा नायगाव व धर्माबाद तालुक्याचे केंद्रबिंदू आहे डॉक्टर माधव विभुते यांनी परी हॉस्पिटल च्या माध्यमातून मतदार संघात एक उत्कृष्ट स्त्री रोग तज्ञ डॉक्टर म्हणून नावाजलेले आहेत जेव्हा एखाद्या वेळी रुग्णावर कटिंग प्रसंग येतो त्यावेळी डॉक्टर विभूते हे आपले कर्तव्य सरकारी दवाखाना असो की कुठलेही ठिकाण असो डॉक्टर या नावाने माणुसकी बाळगत धावत जातात त्यांनी उमरीसारख्या शहरात अल्प किमतीत गरोदर मातांसाठी सी सेक्शन सारखी सेवा उपलब्ध करून दिली आहेत त्याचबरोबर सामाजिक सेवत देखील डॉक्टर विभुते आपला सहभाग नोंदवत सर्व धर्मीयांशी जवळील साधली आहेत पैसे असो अथवा नसो डॉक्टर विभुते यांचा दवाखाना जणू सरकारी दवाखाना असल्याचे प्रतिबिंबित होते असे हे आदर्श व्यक्तिमत्व असणारे डॉक्टर विभूते हे लिंगायत समाजाचे प्रतिनिधित्व करत असून त्यांना सर्व समाजातील नेते कार्यकर्ते अगदी जवळून ओळखत असून त्यांना मोठा जनाधार देखील प्राप्त झाला असून आगामी नायगाव विधानसभा निवडणूक त्यांनी लढवावी अशी सर्व धर्मीय नागरिकांची मागणी सध्याला जोर धरत आहे नायगाव विधानसभा मतदारसंघात लिंगायत समाज हा बहुसंख्येने असून त्याचबरोबर लिंगायत समाजाची निगडित असलेला ओबीसी समाज देखील या मतदार संघात आहेत त्याच समवेत मराठा मुस्लिम यांचे देखील समर्थन विभुते यांना मिळत आहे आपल्या रुग्णसेवेच्या माध्यमातून एक अत्यंत साधा व गरीब कुटुंबातील व्यक्ती असणारे डॉक्टर विभुते यांना मोठा करण्यात तत्कालीन आमदार बापूसाहेब गोरठेकर यांचा मोठा हात आहे त्यांना गोरठेकर यांचा मानसपुत्र म्हणून संबोधल्या जाते अशा या डॉक्टर विभूते यांना उमरी तालुक्यातच नव्हे तर पूर्ण मतदार संघातून मोठा जनाधार मिळत आहे डॉक्टर विभूते यांनी नायगाव विधानसभा मतदारसंघ लढवावी सर्व धर्मीय नागरिकांतून मागणी होत आहे. डॉक्टर माधव विभुते हे जर नायगाव विधानसभा जर लढवली तर शंभर टक्के निवडणूक जिंकणार असे जनतेचा कौल दिसत आहे. मात्र नागरिकांच्या आग्रहास्तव ते आगामी काळात ते कुण्या पक्षाकडून किंवा अपक्ष निवडणूक लढले तर नवल वाटायला नको.

तालुक्यातील नागरिकांच्या आरोग्याची जबाबदारी माझी-आमदार राहुल कुल

शिबिरात १३ हजार ८०० रुग्णांची तपासणी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

दौंड । बबनराव धायतोंडे

दौंड तालुक्यातील नागरिकांच्या आरोग्याची जबाबदारी माझी असून मी गेल्या दहा वर्षात आरोग्याच्या कामांसाठी प्रयत्न करत असल्याचे आमदार राहुल कुल यांनी सांगितले,ते तालुक्यातील बोरीपर्धी (ता.दौंड) येथील बोरमलनाथ मंदीर परिसरात आयोजित करण्यात आलेल्या महाआरोग्य शिबिरात बोलत होते.

यावेळी बोलताना आमदार कुल म्हणाले की, स्वर्गीय आमदार सुभाष आण्णा कुल यांच्या विचारांचा वारसा पुढे चालवत असताना दौंड तालुक्याचा आमदार झाल्यापासून आरोग्याच्या बाबतीत काम करण्याचा निर्णय घेतला आणि गेल्या दहा वर्षात आरोग्याच्या बाबतीत मोठ्या प्रमाणात काम करण्यात मला माझ्या सहकाऱ्यांच्या मदतीने यश आलं आहे. तसेच कोरोना कालावधीत देखील आम्ही मोठं काम उभे केले परंतु त्याची कुठेही प्रसिद्धी केली नाही. यापुढील काळात देखील आरोग्यसेवेला प्राधान्य देण्यात येणार असून या आरोग्य शिबिरात आलेल्या प्रत्येक रुग्णाला योग्य उपचार मिळेपर्यंत आम्ही सर्वजण त्याचा पाठपुरावा करू असे त्यांनी सर्व रुग्णांना अश्वस्त केले.

या शिबिरात सुमारे १३ हजार ८०० रुग्णांची नोंदणी व तपासणी झाली असून, तपासणी ते संपूर्ण उपचार आशा प्रकारचे हे शिबिर आहे. पुण्यातील ५० हुन अधिक नामांकित हॉस्पिटलांनी या महाआरोग्य शिबिरात सहभाग घेतला होता. यामध्ये सुमारे ३००० हुन अधिक नागरिकांना मोफत चष्मे वाटप करण्यात आले.सुमारे ८०० दिव्यांगाना आवश्यक साहित्य वाटप करण्यात आले.या महाआरोग्य शिबिराच्या उद्घाटन कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.दिपक जाधव यांनी केले. यावेळी माजी आमदार रंजना कुल,कांचन कुल, माजी नगराध्यक्ष प्रेमसुख कटारिया,भिमा पाटसचे कारखान्याचे उपाध्यक्ष नामदेव बारवकर,माऊली ताकवणे,धनाजी शेळके,तुकाराम ताकवणे,हरिभाऊ ठोंबरे,धर्मदाय आयुक्त दिलीप देशमुख,प्रांताधिकारी मिनाज मुल्ला,तहसीलदार अरुण शेलार, उपविभागीय पोलीस अधिकारी बापूराव दडस, यवतचे पोलीस निरीक्षक नारायण देशमुख,दौंडचे पोलीस निरीक्षक संतोष डोके व इतर मान्यवर उपस्थित होते .या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन भाजपाचे तालुकाध्यक्ष हरिभाऊ ठोंबरे यांनी केले तर आभार उमेश देवकर यांनी मानले.

मारोतराव कवळे गुरुजी सारखें नेतृत्व जपणे ही काळाची गरज

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

नांदेड । बाजीराव गायकवाड

नायगाव विधानसभा मतदार संघात भलेही इतर गर्भश्रीमंत नेते असतील.राजकीय वारसा असलेले नेते असतील, पण आपल्या जिद्द, मेहनत, चारित्र्य, आणि दूरदृष्टीने मोठं झालेलं आणि हजारो गोरगरिबांच्या आशीर्वादाने उदयाला आलेलं नेतृत्व म्हणजे लोकनेते मारोतराव कवळे गुरुजी होत.अत्यंत अभ्यासू, धडपडे आणि सतत विकासाचा ध्यास मनी असणारे नेतृत्व म्हणजे कवळे गुरुजी होत.अशी माणसे जपली पाहिजे, वाढवली पाहिजे.

कारण यांच्या हातून जे लोक कल्याणकारी कामे होत आहेत, त्यामुळे हजारो लोकांचे कल्याण होताना दिसत आहे.म्हणून सर्वसामान्य माणसासाठी सतत धडपडणाऱ्या कवळे गुरुजींना आता सर्वसामान्य माणसांनीच साथ दिली पाहिजे.

गुरुजींच्या मेहनतीला आता तुमची साथ पाहिजे.कवळे गुरुजींना साथ म्हणजे विकासाची वाट त्यामुळे नांदेड लोकसभा मतदारसंघातील जनतेला वाटते मारोतराव कवळे गुरूजी खासदार व्हावेत आणि संपूर्ण नांदेड जिल्हात उद्योग उभे करून बेरोजगार तरुणांना रोजगार उपलब्ध करून द्यावे अशी जनतेची अपेक्षा आहे.

१० लाखांहून अधिक लोकांनी पहिला माजी मंत्र्याचा मैं हुं डॉन व्हिडिओ सोशल मीडियावर ठरतोय चर्चेचा विषय

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

आष्टी । अण्णासाहेब साबळे

आपल्या अनोख्या शैलीने सर्वांना परिचित असलेले बीड जिल्ह्याच्या राजकीय पटलावर नेहमीच चर्चेत राहिलेले नाव म्हणजे माजी मंत्री सुरेश धस यांचे आहे.म्हणूनच लहानापासून थोरांपर्यंत आपली वेगळी क्रेझ निर्माण करणारा आणि ती लोकप्रियता टिकविनारा लोकप्रतिनिधी म्हणून धस यांच्याकडे पाहिले जाते.नुकत्याच गणरायाच्या विसर्जन मिरवणुकीत धस यांनी विविध गणेश मंडळांना भेटी दिल्या याच दरम्यान त्यांनी विविध गीतांवर ठेका देखील धरला त्यातीलच मैं हु दोन यासह अन्य गाण्याचे त्यांचे व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल होताना दिसत आहे.

मंगळवारी दिवसभर धस यांनी आष्टी सह मतदार संघातील विविध गणेश मंडळांना भेटी देत विसर्जन मिरवणुकीत सहभाग नोंदविला.आष्टी शहरातील मानाच्या गणरायाची विसर्जन मिरवणुका दुपारपासूनच सुरू होत्या.ढोल ताशांचा गजर,पारंपारिक वाद्ये यासह डीजेच्या तालावर मंडळाचे युवक कार्यकर्ते यांच्यासोबत माजी मंत्री सुरेश धस यांनी देखील वाद्यांच्या तालावर ठेका धरत मै हु डॉन,आया है राजा लोगो रे लोगो यासह अन्य गीतांवर ठेका धरला.तरुणांनी अक्षरशः धस यांना डोक्यावर घेतले होते.धस यांनी देखील त्यांच्या आनंदात सहभागी होऊन मंडळांच्या कार्यकर्त्यांची मने जिंकली.उपस्थितांनी त्यांच्या या डान्सचे व्हिडिओ काढून सोशल मीडियावर टाकल्यानंतर ते १० लाखांहून अधिक लोकांना आवडले आणि ते इतरांना शेअर केले.त्यामुळे नेहमीच या ना त्या कारणाने राजकीय क्षेत्रात चर्चेत असलेल्या धस यांनी आपल्यातील वेगळेपणा पुन्हा एकदा सिद्ध केला.

मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासा साठी सदैव कटिबद्ध-आ.शिंदे

बारूळ सर्कल मधील ३६ कोटी रुपये विविध विकास कामांचा शुभारंभ

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

कंधार । धोंडीबा मुंडे

कंधार-लोहा मतदारसंघाचे आमदार श्यामसुंदर शिंदे यांच्या शुभहस्ते कंधार तालुक्यातील बारूळ सर्कल मधील विविध विकास कामांचे उद्घाटन दि.१८ सप्टेंबर रोज बुधवार रोजी संपन्न झाले,वेळी या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून सामाजिक कार्यकर्त्यां सौ.आशाताई श्यामसुंदर शिंदे,लोहा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती विक्रांत दादा शिंदे,तहसीलदार गोरे, उपविभागीय अभियंता सुमित पाटील,हे प्रमुख उपस्थित होते,

याप्रसंगी पेनुर,सोनखेड,कलंबर, बारूळ, पेठवडज, मुखेड रस्ता रा. मा. २५५ किमी ७०/०० ते ७६/२०० बारूळ ते वरवंट रस्त्यांची सुधारणा करणे, बारूळ गावांतर्गत सी.सी रस्ता बांधकाम या लांबीतील सुटलेल्या लांबीची सुधारणा करणे ७३/१०० नंदनवन गावाजवळील ६६/३०० पोचमार्गाचे बांधकाम तालुका कंधार ८ कोटी रुपये,कंधार तालुक्यातील बारूळ येथील शासकीय धान्य गोदाम बांधकाम करणे ३९८.२१ लक्ष रुपये, बारूळ गावाअंतर्गत विविध विकास कामे ५३ लक्ष रुपये, कंधार-लोहा तालुक्यातील पेनुर, शेवडी, सोनखेड, कलंबर, बारूळ रस्त्याचे रुंदीकरण व पूल मोऱ्यासह सुधारणा करणे रा.मा. २५५ किमी ७४/०० ते ७५/०० व ७६/०० ते ८०/५७६- ७.५ कोटी रुपये, अहमदपूर, घोटका, शिंदगी, कुरुळा, कंधार,बारूळ, गडगा रस्त्याचे रुंदीकरणासह सुधारणा करणे रा.मा. ५६ किमी, अ)किमी २२८/३५० ते २२९ /४०० बाचोटी गावाजवळील डोंगराची घाट कटिंग करणे व किमी २४० / ३०० ते २४१ /८०० नामदेव महाराज मठ संस्थान ते बारूळ कॅम्प गावांतील सीसी रस्ता किमी

२४१ /८०० ते २४८ / ५०० बारूळ कॅम्प ते रा.मा.१६१ अ)ता. कंधार १६ कोटी रुपये, वरील सर्व ३६ कोटी रुपये कामाचे विविध विकास कामाचे उद्घाटन लोहा कंधार मतदारसंघाचे लोकप्रिय, कर्तव्यदक्ष आमदार शामसुंदर शिंदे यांच्या शुभ हस्ते काल दि.१८ सप्टेंबर रोजी मोठ्या उत्साहा त संपन्न झाले असून विविध विकास कामांचे उदघाटन झाल्यानंतर महादेव मंदिर मंगल कार्यालय बारूळ येथे सायंकाळी आयोजित जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले होते.

मतदारसंघातील अनेक प्रलंबित विकास कामे माझ्या कार्यकाळात पूर्ण करण्याला मी प्राधान्य दिले असून महिलाचे सक्षमिकरण करण्यासाठी प्रयत्नशील असून मतदार संघाच्या सर्वांगीण विकासासाठी भरीव निधी उपलब्ध करण्यासाठी मी कटिंबद्ध असल्याचे आमदार शामसुंदर शिंदे यांनी बोलताना सांगितले यावेळी सामाजिक कार्यकर्त्यां आशाताई शिंदे बोलताना म्हणाल्या की मतदारसंघातील सुजाण जनता विकासाच्या पाठीशी खंबीरपने उभी असून आमदार शिंदे कुटूबीय मतदारसंघाच्या विकासासाठी तत्पर असल्याचे बोलताना सांगितले, यावेळी कार्यकर्ते पदाधीकारी, गावकरी, महिला भगिनी मोठया संख्येने उपस्थित होते.

ईद निमित्त रक्तदान शिबीर

श्रीगोंद्यात मुस्लिम समाजाकडून आगळ्या वेगळ्या उपक्रमाचे आयोजन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

श्रीगोंदा । ज्ञानेश्वर येवले

ईद या मुस्लिम समाजाच्या पवित्र सणाचे औचित्य साधून श्रीगोंदा शहरातील मुस्लिम तरुण अतिक कुरेशी यांच्या संकल्पनेतून श्रीगोंदा शहरात रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अनेक रक्तदात्यांनी रक्तदान केले.

अतिकभाई कुरेशी यांनी एक हिंदू मुस्लिम ऐक्याचा चांगला संदेश जावा म्हणून श्रीगोंद्यातील तरुण पिढीतील तरुणांना बरोबर घेऊन रक्तदान शिबीराचे आयोजन केले होते.यावेळी अनेक रक्तदात्यांनी रक्तदान करून शिबिरास चांगला प्रतिसाद दिला . यामध्ये मोमीन कुरेशी, शरीफ

कुरेशी, शब्बीर कुरेशी अल्ताप कुरेशी, शहारुक कुरेशी, मंजून कुरेशी मुनाप कुरेशी, यांनी रक्तदान केले.व अंजुम, व मंजूम कुरेशी यांनी शिबीराचे आयोजन केले होते. अनेक मान्यवरानी या उपक्रमाचे कौतुक केले. व आयोजकांचे अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या.

नांदेड जिल्ह्यातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना २५ टक्के अग्रीम देण्याच्या विमा कंपनीला सूचना

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

नांदेड । बाजीराव गायकवाड

नांदेड जिल्ह्यातील सर्व महसूल मंडळातील पिकांच्या उत्पादनामध्ये ५० टक्केपेक्षा जास्त घट अपेक्षित असल्याचे जिल्हास्तरीय समितीने आपले निरीक्षण नोंदविले आहे. त्यामुळे अशा परिस्थितीत मोबदला देण्यासाठी असलेल्या नियमानुसार पिक विमा कंपन्यांनी २५ टक्के अग्रीम तातडीने द्यावा, अशी सूचना विमा कंपनीला करण्यात आली आहे.

जिल्हास्तरीय समितीने नांदेड जिल्ह्यातील सर्व तालुक्यांसाठी प्रधानमंत्री पीक विमा योजना २०२४-२५अंतर्गत हंगामातील प्रतिकुल परिस्थिती अर्थात मिड सेशन डव्हरसिटी अशी अधिसूचना लागू केली आहे. त्यामुळे समितीच्या सर्वेक्षण अहवालानुसार नांदेड जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये पिकांच्या उत्पादनामध्ये ५० टक्के पेक्षा जास्त घट अपेक्षित आहे. त्यामुळे समितीने जिल्ह्यातील कापूस, सोयाबीन, तूर, ज्वारी या पिकांसाठी हंगामातील प्रतिकूल परिस्थितीची अधिसूचना लागू केली आहे.

त्यामुळे सर्व महसूल मंडळातील पात्र विमाधारक शेतकऱ्यांना विहित मुदतीत नुकसान भरपाई अग्रीम रक्कम अदा करण्याचे निर्देश जिल्हास्तरीय समितीने विमा कंपनीस दिले आहेत.

सद्यस्थितीत हंगामतील प्रतिकूल परिस्थिती या घटकांअंतर्गत २५ टक्के अग्रीम रक्कम मिळणार असून उर्वरीत रक्कम स्थानिक नैसर्गिक आपत्तीअंतर्गत पंचनामे व पिक कापणी प्रयोगाच्या आकडेवारीनुसार मिळेल याची सर्व शेतकरी बंधूनी नोंद घ्यावी. मोबदला कसा मिळेल हे समजून घ्यावे. कोणत्याही अपप्रचाराला बळी पडू नये, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी कार्यालयाने केले आहे.

राजकुंवर महाविद्यालय येथे मराठवाडा मुक्ती संग्राम दिन साजरा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

वाघरुळ । प्रतिनिधी

जहागीर ता. जिल्हा. जालना येथील राजकुंवर महाविद्यालय येथे ७५ वा मराठवाडा मुक्ती संग्राम दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. ध्वजारोहण सकाळी ८.१५ मी. वाजता करण्यात आला. महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.राजेंद्र जायभाये सर यांच्या हस्ते मुख्य ध्वजारोहण करण्यात आला. यावेळी महाविद्यालयाचे मराठी विभाग प्रमुख प्राध्यापक भरत लेंडीकर सर उपस्थित होते. त्याचबरोबर महाविद्यालयातील प्राध्यापक अनिल शिंदे (राष्टीय सेवा योजना कार्यक्रमधिकारी) प्रा.विजयकुमार देशमुख, प्रा. प्रवीण गाडेकर, प्राध्यापिका सरला डोईफोडे मॅडम ,प्रा. चंद्रमुनी जोगदंड, प्रा. शेख सारेक् ,प्रा. अरुण गीते ,प्रा.समाधान सरोदे ,श्री. भगवान जोगदंड, श्री गजानन जोगदंड ,श्री .सुनील शिंदे,संतोष जाधव व इतर कर्मचारी उपस्थित होते.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904